I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 241-245

A Double-Blind Peer Reviewed Journal

OPEN ACCESS

e-ISSN 2347 – 517X

Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# ग्रामीण विकासाच्या संदर्भात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना

**उज्वला तेजराम कापगते (हांडेकर)**

कर्मवीर महाविद्यालय मुल जि. चंद्रपुर

*Corresponding Author :- ujwalakapgate@gmail.com

Communicated : 31.01.2023 | Revision : 07.03.2023 Accepted : 05.04.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**

ग्रामीण क्षेत्राचा संपूर्ण विकास करून गावातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी देशात शासन स्तरावरून विविध कार्यक्रम व योजना हाती घेण्यात आल्या यात ग्राम विकासाकरीता गावात रस्त्यांची निर्मिती करून गावागावांना जोडुन ग्रामीण विकासाचे लक्ष प्राप्त करण्यासाठी केंद्र सरकारकडुन सूरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY)या योजनेचा विशेषतत्वाने उल्लेख करावा लागेल. ग्रामीण भागात जवळपास ७० टक्के जनता निवास करते. देशातील एकून राष्ट्रीय उत्पन्नाचा जवळपास ४०टक्के हिस्सा हा गावातून प्राप्त होत असत. त्यामुळेच देशांचा नियोजन बध्द व समुचीत विकास साधण्यासाठी ग्रामीण विकास साधने अंत्यत आवश्यक ठरते. ग्रामीण रस्ते हे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाची किल्ली आहेत. ग्रामीण विकासात रस्त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान असते या योजनेचा मुख्य उद्देश हा दर्जेदार बारमाही रस्त्यांच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रांना रस्त्यांची संपर्कता प्रदान करणे रस्त्यांची उपलब्धता करून गावाला होणाऱ्या सामाजिक आर्थिक लाभावर लक्ष केंद्रीत करून ग्रामीण क्षेत्रात रस्ते निर्माण प्रक्रियेवर विशेष जोर देण्यात आला. चांगल्या बारमाही रस्त्यांच्या माध्यमातुन ग्रामीण भागांना रस्त्यांनी जोडणे हे व त्यांच्यात संपर्क निर्माण करणे हा प्राथमिक उद्देश प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचा आहे. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून संबधीत ग्रामीण क्षेत्रात बारमाही रस्त्यांची निर्मिती करण्यात आल्यामुळे शेती क्षेत्र रोजगाराची निर्मिती लोकांच्या जीवन स्तरात सूधारणा, आरोग्याच्या सूविधेत वाढ, ग्रामीण पर्यटनाला चालना ग्रामीण क्षेत्रात उच्च माध्यमीक तथा उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संख्येत मोठी भर पडलेली आहे त्यामुळे प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ही ऐका गावाचा दूसऱ्या गावाशी तसेच गावाचा शहराशी बारमाही रस्त्याद्वारे संपर्क प्रदान करतांनाच ग्रामीण क्षेत्रातील लोकांच्या उथ्थांनासाठी मैलाचा दगड ठरली आहे.

**मुख्यशब्द :** गाव, योजना, जीवनमान, विकास, उत्पादन, बारमाही, आवागमन, बाजारपेठ, आरोग्य, शिक्षण, पर्यटण..

## प्रस्तांवना :

भारत देश हा खेडयांचा देश म्हणून ही ओळखल्या जातो. आजही भारतात जवळपास २‌६३ जनता ही खेडयामध्ये निवास करते. देशातील ग्रामीण समाज हा आपल्या शक्तीचा खऱ्या अर्थाने आधार आहे. त्यातच हा ग्रामीण समाज आपल्या प्राचीन सभ्यता आणि संस्कृतीची प्रतिक सूध्दा आहे. म्हणुनच खेडयांना भारताच्या आत्म्याची संज्ञा दिली जाते. ऐतीहासीक दृष्टया भारतातील प्राचीन खेडी ही स्वंयपूर्ण, स्वायत्त व स्वांवलबी व हस्तोद्योग हे परिपक्व स्थीतीत होते. त्यामुळे खेडयात निवास करणाऱ्या लोकांची आर्थिक – सामाजीक स्थिती सूध्दा ही उत्तम दर्जाची होती. उत्पादन, विनिमय, वितरण, आवागमन, मनोरंजन न्याय इ. बाबीच्या उपलब्धते बरोबरच सामाजिक आणि सांस्कृतीक जीवनाची सूध्दा एक विशेष व्यवस्था ही गाव खेडयात होती तर झालेल्या अनेक आक्रमनांनंतरही गावातील स्वायत्त व्यवस्थेला व एकसंघ भारतीय समाजाला कोणताही प्रकारचा तडा गेला नाही. मात्र इंग्रजांच्या आगमनानंतर या स्थितीत खऱ्या अर्थाने बदल झाला. इंग्रजांनी राज्यकारभार करतांना शहराकडे अधिक लक्ष दिल्यामूळे ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष झाले व परीणामी गावाची स्वायतत्ता लयास गेली. गाव– खेडयाकडे दुर्लक्ष झाल्यामूळे गावात विविध समस्यांनी डोळे वर उचांवले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गावाला आलेले उकीरडयाचे स्वरूप व गावातील विविध समस्यांची सोडवणूक करण्यासाठी शासन स्तरावरून अनेक योजनांची निर्मिती व त्यांची कार्यवाही सूध्दा करण्यात आली. देशात राबवीण्यात आलेल्या पंचवार्षीक योजनेत सुध्दा गावाच्या विकासावर प्राथमिक विकासावर भर देण्यात आला. ग्रामीण क्षेत्राचा संपूर्ण विकास करून गावातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी देशात शासन स्तरावरून विविध कार्यक्रम व योजना हाती

घेण्यात आल्या. यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वर्ण जयंती, ग्राम स्वंयम रोजगार योजना, इंदीरा आवास योजना, ग्रमीण युवक स्वयंम रोजगार प्रशिक्षण योजना, प्रधानमंत्री ग्रामोदय योजना, सर्व शीक्षा अभियात इ. अशा अनेक योजनांचा समावेश आहे. अशातच ग्राम विकासाकरीता गावात रस्त्यांची निर्मिती करून गावागावांना जोडुन ग्रामीण विकासाचे लक्ष प्राप्त करण्यासाठी केंद्र सरकारकडुन सुरू करण्यात आलेल्या प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY)या योजनेचा विषेश तत्वाने उल्लेख करावा लागेल. गावापर्यत पोहचण्यासाठी ग्रामीण रस्त्यांना विशेष महत्त्व असते. अशा ग्रामीण क्षेत्रातील रस्त्यांच्या निर्मिती व विकासामध्ये प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेने महत्त्वपुर्ण भूमिका वटविलेली आहे.

**ग्रामीण विकास :—**

ग्रामीण विकासाची संकल्पना ही स्थिर नसून गतीशील आहे. ही संकल्पना ग्रामीण क्षेत्रातील निवासीत निर्धन लोकांच्या जिवण स्तरात सुधारणा करून त्यांना आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे निर्देशीत करते. अशा लोकांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासोबतच पर्याप्त प्रमाणात सामाजिक सुविधांची उपलब्धता करणे यात अपेक्षीत आहे. ग्रामीण जिवणातील निगडीत विविध बांबीचा पुरेशा प्रमाणात विकास घडवून आणणे आवश्यक असते. यात प्रामुख्याने शेती, सिंचन, संचार, शिक्षण, आरोग्य, रोजगार उद्योग धंदे, रस्ते, इ. चा समावेश होतो. वास्तविकपणे ग्रामीण विकास हे कोणत्याही देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. यात रस्त्यांची उपलब्धता वा विकास शिर्षस्थानी आहे. ग्रामीण भागात जवळपास ७० टक्के जनता निवास करते. देशातील एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा जवळपास ४० टक्के हिस्सा हा गावातून प्राप्त होत असते. त्यामूळेच आर्थिक नियोजनाद्वारे राष्ट्रीय विकास साधण्यासाठी ग्रामीण विकास अत्यंत आवश्यक ठरतो.

कोणत्याही राष्ट्रात त्या राष्ट्राच्या समृध्दतेमध्ये व संपन्नतेत ग्रामीण समाज हा विशेष उल्लेखनिय कामगीरी पार पाडत असतो. राष्ट्राच्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बहूतांश उपलब्धते बरोबरच अन्नधान्ये व इतर कच्चामाल यांचे उत्पादन हे प्रामुख्याने ग्रामीण भागातच होत असते. शहरांच्या विविध बाबतीतील गरजांची पूर्तता सुध्दा ही ग्रामीण उत्पादनातूनच भागवीली जाते. त्यातच शहरातील औद्योगीक व्यवसायांना श्रमीक पूरवण्याची जबाबदारीही ग्रामीण भागच पार पाडते. त्यामुळेच देशांचा नियोजनबध्द, व समुचीत विकास साधण्यासाठी ग्रामीण विकास साधने अंत्यत आवश्यक ठरते. भारतासारखे जे अनेक विकसनशिल देश आहेत. अशा देशांना तर ग्रामीण विकास साधने अंत्यत महत्त्वाचे ठरते.

ग्रामीण भागात वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या आर्थिक व सामाजिक हीताची रक्षा करून त्यांचे कल्याण करण्याच्या व्यापक उद्देशानेच ग्रामीण विकासाची संकल्पना विकसीत झालेली आहे. या अनुषंगानेच शासन स्तरावरून विविध विकासात्मक कार्यक्रमाचे आणि कल्याणकारी योजनांचे संचालन करण्यात आले आहेत. देशातील समस्त ग्रामवासीयांचे अर्थिक स्तर उंचविण्यासाठी प्रयत्न करणे, यात विषेश करून शेती व शेती संबधीत उद्योगांचे मागासलेपण दूर करणे, ग्रामीण उद्योगधंद्याचा समुच्चीत विकास करणे, देशातील ग्रामीण भागात वास्तव्यास असलेल्या लोकांना त्यांच्या स्थानिक स्तरावरच रोजगाराची उपलब्धता करणे, ग्रामीण समुदायाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवन प्रगतशील बनविण्याकरीता ग्रामीण क्षेत्रातच आवागमन. व संचार साधनांचा पर्याप्त प्रमाणात विकास करणे, ग्रामीण जनतेच्या आरोग्याचा स्तर सुधारून त्यांना पूरेशी निवासाची ुविधा करणे इ. अशा विविध

I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 241-245
A Double-Blind Peer Reviewed Journal

e-ISSN 2347 – 517X
Original Article

व्यापक उद्देशाचा समावेश हा ग्रामीण विकासाच्या संकल्पने अंतर्गत होत असतो. एकुणच ग्रामीण विकासाचा अर्थ हा ग्रामीण जनसंख्येच्या निम्न उत्पन्न असलेल्या लोकांच्या जीवनमानात सुधारणा करणे होय.

**प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ( PMGSY):—**

देशातील ग्रामीण भागात अधिकाधिक लोकसंख्येचे असलेले वास्तव्य तसेच देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात ग्रामीण भागाचा असलेला महत्त्वपूर्ण वाटा तसेच शहरांच्या विविध गरजांची ग्रामीण भागातून होत असलेली पूर्तता इ. मुळे देशाचा विकास हा गावाच्या विकासावर अवलंबुन असतो आणि ग्रामीण विकासात रस्त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान असते. ग्रामीण रस्ते हे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाची किल्ली आहेत. रस्त्यांनाच देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीचे द्योतक मानण्यात येते. यात ग्रामीण रस्त्यांच्या विकासात केंद्र शासनाद्वारे संचालीत करण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश हा दर्जेदार बारमाही रस्त्यांच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रांना रस्त्यांची संपर्कता प्रदान करणे हे आहे. रस्त्यांच्या विकासाच्या माध्यमातून प्रत्येक गावाला विकासाच्या मुख्य प्रवाहाने जोडण्याचा संकल्प या योजनेद्वारे सरकारने केलेला आहे. गावागावात रस्त्यांची निर्मिती झाली तर आवश्यक पायाभूत सुविधा तसेच विभिन्न योजना सूध्दा गावापर्यंत पोहचविणे सहज शक्य होणार आहे.

देशात बारमाही रस्त्यांची निर्मिती न होणे हे ग्रामीण क्षेत्रातील विकासांच्या मार्गातील मोठा अडथळा आहे. अशा क्षेत्रात जाणे शक्य होत नसल्यामूळे ग्रामीण जनता ही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून विलग होत असते. रस्त्यांची उपल्ब्धता करून गावाला होणाऱ्या सामाजिक आर्थिक लाभावर लक्ष केंद्रीत करून ग्रामीण क्षेत्रात रस्ते निर्माण प्रक्रियेवर विशेष जोर देण्यात आला. या प्रक्रीयेला प्रात्यक्षीत स्वरूपात मिळालेली जोड म्हणजे प्रधाणमंत्री ग्राम सडक योजनेचे निर्माण होय. तत्कालीन प्रधानमंत्री श्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्म दिनाचे औवचित्य साधून २५ डींसेबर २००० रोजी या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. ही योजना संपूर्ण १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेसाठी वा कार्यक्रमासाठी हायस्पीड डीस्लेवर लावण्यात आलेल्या उपकरणांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या वितिय रकमेचा ५० : हीस्सा हा ग्रामीण रस्त्यांच्या निर्मितीसाठी उपलब्ध करून दिला जातो. या कार्यक्रमातंर्गत केवळ ग्रामीण क्षेत्रातीलच रस्त्यांची निर्मिती केली जाते. याकरीता ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारा राष्ट्रीय ग्रामीण विकास सडक विकास ऐजन्सी (NRRDA) या नियामक संस्थेची निर्मिती करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय ग्रामीण सडक विकास ऐजन्सी मंत्रालयाद्वारा राष्ट्रीय (NRRDA) ही संस्था ग्रामीण रस्त्यांशी संबधीत उपयूक्त आराखडा तयार करण्यासाठी ग्रामीण विकास मंत्रालय साहय करीत असतांनाच संबधीत रांज्याना ही रस्त्यांची योजना तयार करण्यासाठी मदत करीत असते. एकूणच चांगल्या बारमाही रस्त्यांच्या माध्यमातुन ग्रामीण भागांना रस्त्यांनी जोडणे हे व त्यांच्यात संपर्क निर्माण करणे हा प्राथमिक उद्देश प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचा आहे.

**ग्रामीण विकासात प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे योगदान :—**

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून गावातील रस्ते ही थेट मुख्य रस्त्याशी जोडल्या गेल्यामूळे या योजनेच्या लाभार्थी ग्रामवासीयांच्या जीवनावर खोलवर प्रभाव पडलेला आहे. या योजनेमूळे संबधीत वैयक्तीक विकासाची नवी दारे उघडल्या गेलेली आहेत.

शेती क्षेत्रावरील प्रभाव :—

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून संबधीत ग्रामीण क्षेत्रात बारमाही रस्त्यांची निर्मिती करण्यात आल्यामुळे परिवहन साधनाची मोठया प्रमाणात वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे शेतातील त्यातच उत्पादने ही थेट बाजारपेठेत पोहचविण्यात मदत मिळाली आहे. त्यातच शेतीसाठी लागणारी अवजारे, नवनवीत तंत्रज्ञान, खत तसेच किटकनाशके यांची वेळेवर उपलब्धता होत असल्यामुळे शेतीविषयक कार्यात कुशलता आलेली असतांनाच वेळेची सूध्दा मोठया प्रमाणात बचत होत आहे. रस्त्यांच्या विकासामुळेच शेतीतून शेतकरी नगदी पीक घेऊ लागले आहेत. याच व्यवसायासाठी निगडीत व्यवसाय म्हणजेच दुग्ध व्यवसाय यातही मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. शेतीत उत्पादन वाढविण्यासाठी शेतीतील नव—नवीन प्रयोगामुळे शेतीसंबधात अन्य व्यवसायात रोजगाराची उपलब्धता झालेली आहे.

**रोजगाराची उपलब्धता :—**

शेती क्षेत्रातील झालेल्या बदलामूळे या माध्यमातून रोजगाराची उपलब्धता होतांनाच रस्त्याच्या निर्माणामुळे गावातील लोक ही रोजगारासाठी दुरवर न जाता अगदी जवळच्या शहरातूनही काम मिळवू लागले आहे. रस्त्यांच्या विकासामुळे गतीशील वाहनाच्या संख्येत भर पडल्यामूळे ग्रामीण भागातील अंधीकांश जनता मजूरीच्या कार्यात लागली आहे. अशातच काही ग्रामवासी हे स्वंयम रोजगाराची निर्मिती सुध्दा करतांना दिसतात. रस्त्यांच्या उपलब्धतेमुळेच आज ग्रामीण भागात अगदी शहरासारखेच हाटेल व्यवसाय, गॅरेज वर्कशाप, किराणा — जनरल स्टोअर्स, टैक्सी व्यवसाय इ.व्यवसायाला चालना मिळून याद्वारे सूध्दा रोजगाराची उपलब्धी होऊ लागली आहे. अशातच रस्ते निर्माण प्रक्रियेत स्थानिक लोकांना यातून रोजगार मिळू लागला आहे.

**दारिद्र निर्मुलनात साहय :—**

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे उद्दीष्ट हे ग्रामीण क्षेत्रात रस्ते निर्माण करण्यासोबतच दारिद्र निर्मुलन करून अर्थ व्यवस्थेला गती प्रदान करणे आहे. या क्षेत्रात रस्त्यांची निर्मिती झाल्यामुळे लोकांना शेती तसेच गैर क्षेत्राअंर्तगत रोजगाराची उपलब्धता होऊन तसेच स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त झाल्यामुळे तेथील लोकांच्या आर्थिक मिळकतीमध्ये वाढ होऊन परिणाम स्वरूप निर्धनतेत कमी आलेली आहे त्यामुळे अशा लोकांच्या जीवनस्तरात सुधारणा होऊन ते व्यक्तीगत व कौंटूबिक विकासाकडे आगेकूच होतांना दिसतात.

**ग्रामीण पर्यटनाला चालना :—**

ग्रामीण भाग हे निसर्गाशी अगदी समीप असतात. डोंगर, नद्या, नाले, तलाव, जंगले, टेकडया इ. च्या उपलब्धते बरोबरच काही ग्रामीण क्षेत्रात पुरातत्व मंदीराचेही मोठया प्रमाणात वास्तव्य असलेले दिसते. अशातच हे ग्रामीण क्षेत्र रस्त्यांनी शहर व महानगराशी जोडल्या गेल्यामूळे या क्षेत्राकडे शहर वासीयांची ये—जा वाढलेली आहे. त्यांमूळे ग्रामीण क्षेत्रातील अशा उपलब्धतेमूळे पर्यंटन स्थळ म्हणून विकसीत होण्यास भरपूर मदत झालेली आहे. शहर वासीयांच्या गरजांची पूर्तता म्हणून विविध दूकाने व हॅटेलची निर्मिती होऊन स्थानीक लोकांना गाईडच्या स्वरूपातही रोजगाराची उपलब्धी झालेली आहे.

**आरोग्याच्या सुविधेत वाढ:—**

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना कार्यान्वीत होण्यापूर्वी ग्रामीण क्षेत्रात रस्त्याची निर्मिती झालेली नाही असे नाही. मात्र तूलनेत अशी रस्ते ही दर्जाहीन होती. त्यातच गावातील अनेक समस्या सोबतच आरोग्यांची समस्या ही प्रमूख होती. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमांतुन ग्रामीण क्षेत्रात दर्जेदार व मोठया प्रमाणात रस्त्यांचे जाळे निर्माण झाल्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील आरोग्य सूविधेत भर पडलेली आहेत. ग्रामीण लोकांना आपल्या उपचारासाठी शहरात

जाण्यासाठी विविध समस्यांचा सामना हे रस्ते निर्मितीमूळे करावा लागत नाही. त्यातच आरोग्य कर्मचारी तसेच डॉ. यांच्याही ग्रामीण क्षेत्रातील वाऱ्यात वृध्दी झालेली आहे. यांच्याकडुन आरोग्याचे धडे वारंवार मीळु लागल्यामूळे सुध्दा गाववासीयात आरोग्याप्रती जागृकता निर्माण होत आहे. शहरातील मोठया दवाखाण्यात जाण्यासाठी सुध्दा रस्ते निर्मितीमुळे वाहनाची उपलब्धता होऊ लागलेली आहे. त्यामुळे महीलांची सूरक्षीत प्रसुती, लसीकरणाला मोठया प्रमाणात यश मिळत असतांनाच गंभीर आजारावरही प्रतीबंधात्मक उपाय करणे शक्य होत आहे.

**शैक्षणिक विकास:–**

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून रस्त्याची उपलब्धता होऊन ग्रामीण लोकांचे शहरी लोकांशी संपर्काची प्रक्रिया ही सरळ झालेली आहे. ज्याचा परिणाम हा ग्रामीण विद्यार्थीत उच्च शिक्षणाप्रती रूची वाढतांना दिसते. अशातच अवागमनाची साधने उपलब्ध होत असल्यामूळे विद्यार्थी सुध्दा पुढील शिक्षणासाठी शहराकडे सहज जाऊ लागले. याचा परिणाम उच्च माध्यमीक तथा उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संख्येत मोठी भर पडलेली आहे. अशातच ग्रामीण क्षेत्रातील शाळेत शिक्षकांची नियमीतता वाढलेली. शहरासारखेच इंग्रजी माध्यमाचे शिक्षण गावात उपलब्ध होत असतांना शाळा व महाविद्यालयाच्या संख्येतही वाढ झालेली आहे.

**निष्कर्ष :–**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशात ग्रामीण विकासाच्या संदर्भात केंद्र शासन स्तरावरून अनेक योजना व कार्यक्रमांची निर्मिती करण्यात आली. यात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ही ऐका गावाचा दूसऱ्या गावाशी तसेच गावाचा शहराशी बारमाही रस्त्याद्वारे संपर्क प्रदान करतांनाच ग्रामीण क्षेत्रातील लोकांच्या उथ्थांनासाठी मैलाचा दगड ठरली आहे. देशाच्या विविध भागात या योजनेच्या वित्तीय आणि भौतीक प्रगती संबधातील स्थिती ही विषेश समाधानकारक नसली तरी ज्या काही रस्त्यांची निर्मिती या योजनेद्वारे करण्यात आलेली आहे त्यांचा गाव वासीयावरील आर्थिक आणि सामाजिक प्रभाव हा सकारात्मकच स्वरूपात दिसतो. ग्रामीण संपर्कता आणि आर्थिक, सामाजिक विकास यांचा अनोण्य संबध आहे. त्यातूनच अर्थ व्यवस्थेमध्ये रोजगाराची निर्मिती शिक्षण, आरोग्य, इ. सारख्या आधारभुत सुविधांचा विकास होत असतो. एकूणच रस्त्यांची उपलब्धता करून गावागावाला संपर्क साधनांनी जोडुन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे सहज शक्य होत आहे.

**संदर्भ :**

माहोरे रामदास, २०१६, अर्थशास्त्राचे सिध्दांत, साई ज्योती पब्लीकेशन्स, नागपूर.

डॉ. झामरे जी. एन., २०१६, सुक्ष्म अर्थशास्त्र: भाग २, पिंपळापूरे ॲंड पब्लीशर्स, नागपूर.

डॉ. काकडे जे. एम., डॉ. कावळे एस. एस., डॉ. कायरकर मनिष, २०१९, भारतीय अर्थव्यवस्था, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर.

राणा के. सी. आणि वर्मा विशाल, समष्टी आर्थिक विश्लेषण, पब्लीशिंग कं. जालंदर, दिल्ली.

डॉ. मुळे डी. व्ही., (प्रकाशक), सुक्ष्म लक्षी आर्थिक विश्लेषण, दुर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

डॉ. मंडल, कृषी विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे पब्लिशर्स नागपूर.